# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
क्र.वि.नि.वि.वि/१३/२०१८
१० ऑक्टोंबर, २०१८

परिपत्रक:—

विषय : माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस “वाचन प्रेरणा दिवस” म्हणून साजरा करणेबाबत

संदर्भ : १. शासन पत्र क्र. उशिसं/ /मवि—१/वाचन प्रेरणा दिवस/ परिपत्रक २०१८/१७६१ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८
२. शासन निर्णय क्र. वाप्रेदि—२०१८/प्र.क्र.१३३/भाषा—३ दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठातील विविध विभागांचे/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक यांना उपरोक्त संदर्भीय शासन परिपत्रकानुसार सुचित करण्यात येते की, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दिनांक १५ ऑक्टोबर, २०१८ हा जन्मदिन “वाचन प्रेरणा दिवस” म्हणून साजरा करण्यात यावा.

विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी “वाचन प्रेरणा दिवस” साजरा करण्याबाबत संभाव्य कार्यक्रमाची यादी संदर्भांकित शासन पत्र क्रमांक उशिसं/ /मवि—१/वाचन प्रेरणा दिवस/परिपत्रक२०१८/१७६१ दिनांक ५ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय क्र. वाप्रेदि—२०१८/प्र.क्र.१३३/भाषा—३ दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) मध्ये नमुद केली आहे. (प्रत संलग्न)

11.10.18

मुंबई— ४०० ०३२
१० ऑक्टोबर, २०१८

(प्रा. सुनिल भिरूड)
कुलसचिव (प्र)

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे/संस्थांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठातील विविध विभागांचे/संस्थांचे विभाग प्रमुख/संचालक

———————

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

Web : www.dhepune E-Mail : mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

REG/I(D)/2018-19/724

क्र.: उशिसं//मवि-१/वाचन प्रेरणा दिवस/परिपत्रक२०१८/९७६९ दिनांक: ०५.१०.२०१८

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

AR (APD)
9.10.18
I/C Registrar

विषय: डॉ.ए.पी.जे. अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस- दि. १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करणेबाबत..

संदर्भ: मराठी भाषा विभागाचा शासन निर्णय क्र.: वाप्रेदि-२०१८/प्र.क्र.१३३/भाषा-३
दि. १.१०.२०१८

भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दूल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा करण्याबाबत शासन परिपत्रक क्र.: बैठक-२४१३/ प्र. क्र. १४०/ १५/समन्वय दि. ०९ ऑक्टोंबर २०१५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

याच अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये व समाजाच्या इतर घटकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याबाबत संभाव्य कार्यक्रमांची यादी संदर्भांकित शासन निर्णयान्वये देण्यात आलेली आहे. त्यानूसार दि. १५ ऑक्टोंबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून दरवर्षी साजरा करण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

दि. १.१०.२०१८ च्या शासन निर्णयातील कार्यक्रमांबरोबरच पुढील उपक्रम ही राबविता येऊ शकतील याबाबत सर्व संबंधितांना अवगत करावे-

१. महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त महात्मा गांधी यांच्या पुस्तकांचे वाटप. उदा.- माझे सत्याचे प्रयोग.
२. ग्रंथदिंडी
३. विद्यार्थ्यांचा वाचलेल्या पुस्तकांबाबत चर्चा/परिसंवाद
४. महान व्यक्तींच्या मौलीक विचारांचे सामुहिक वाचन
५. पुस्तकावरच्या गप्पा
६. थोर व्यक्तींच्या आयुष्यातील वाचनाचा प्रभाव- भित्तीचित्रे
७. गरजू व वाचनाची आवड असलेल्या विद्यार्थ्यांना पुर्व मागणी नूसार मोफत पुस्तक वाटप
८. पुस्तक लॉटरी - विद्यार्थी/कर्मचा-यांना अनपेक्षितपणे आवडत्या पुस्तकाची भेट.
९. पुस्तकांवरील प्रश्नमंजूषा
१०. प्रशासनामध्ये उपयुक्त पुस्तकांचे कर्मचारी व अधिका-यांना पुस्तक भेट

**<u>माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.</u>**

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन निर्णय क्रमांक: वाप्रेदि-२०१८/प्र.क्र.१३३/भाषा-३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १ ऑक्टोबर, २०१८

वाचा : मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि - २०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५.

<u>शासन परिपत्रक :-</u>

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था / मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. दिनांक १५ ऑक्टोबर, शासकीय / निमशासकीय कार्यालये, शाळा यांनी कार्यक्रमाचे आयोजन करावे, प्रत्येक अधिकारी / कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी, शिक्षकवर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी कामकाजाच्या वेळेमध्ये किमान अर्धा तास वाचनासाठी द्यावा, वाचनाकरीता समुहाने एकत्रितपणे बसून आपला वेळ वाचनासाठी सलग काही तास "वाचन ध्यास" म्हणून व्यतित करावा.
२. वाचन संस्कृती जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक भेट द्यावे.
३. चालू वर्ष हे ख्यातनाम साहित्यिक पु.ल.देशपांडे, ग.दि.माडगुळकर यांची जन्मशताब्दी तसेच राम गणेश गडकरी यांचे स्मृतीशताब्दी वर्ष आहे. त्या अनुषंगाने या मान्यवर साहित्यिकांच्या साहित्याशी संबंधित समर्पक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.
४. विविध क्षेत्रातील सुप्रसिध्द व्यक्ती ज्यांचा वाचक म्हणूनही लौकिक आहे. त्यांचे सहकार्य घेऊन वाचन प्रेरणा किंवा वाचन संस्कृतीशी संबंधित विषयावर व्याख्यान /चर्चासत्र / परिसंवाद / कार्यशाळा यांचे आयोजन करण्यात यावे.
५. लेखकांशी त्यांच्या लेखनाविषय, त्यांच्या कलाकृतींविषयी चर्चा किंवा त्यांच्या प्रकट मुलाखतींचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

श्रीम उषा शिंदे
03/10/2018